अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई-३०
दुरध्वनी क्र.- ०२२-२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :- ३०/०४/२०२५

## —: प्रेसनोट :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १७/२०२५ |
| कलम | कलम ७, १२ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | १) संजय वसंत घोलप, मुख्य निरीक्षक(प्रभारी महा. अधिक्षक)<br>२) तुळशीदास मधुकर कडू, शिपाई<br>३) सचिन रामदास कोंडविलकर, शिपाई, महात्मा ज्योतिबा फुले मंडई, सी.पी.आफिस समोर, मुंबई |
| लाचेची मागणी | दर महिन्याला रू. १०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु.१०,०००/- |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांना महानगर पालिकेने सन २०२२ मध्ये रेडकटिंग मध्ये २२५ चौ.फुट गाळा दिला आहे. सदर गाळयाच्या समोर मोकळी जागा असून तक्रारदार हे सन २०२३ पासून तेथे लहान मुलांना योगा शिकवण्याचे काम करतात. बी.एम.सी. च्या मोकळया जागेवर योगा शिकवत असल्याने तक्रारदार यांना बी.एम.सी.(बाजार विभाग), पी.ए.पी. महानगरपालिका मंडई यांचे कडून दिनांक ०१/१०/२०२४ व १९/१०/२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे. बीएमसी अधिकारी श्री. संजय घोलप यांनी तक्रारदार यांना पी.ए.पी. महानगरपालिका मंडई येथे बोलावून सांगितले की, "जर तुम्हाला तिसरी नोटीस नको असले, तर मला प्रत्येक महिन्याला रू. १०,०००/- दयावे लागतील". परंतु तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २१/०४/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१/०४/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना दिनांक २२/०४/२०२४ रोजी भेटण्यास बोलाविले. त्यानुसार दिनांक २२/०४/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांची भेट झाली नाही. तदनंतर दिनांक २३/०४/२०२५ रोजी लोकसेवक यांनी तक्रारदार यांना संपर्क केला असता, दिनांक २८/०४/२०२५ रोजी भेट घेण्याचे ठरले. त्यानुसार दिनांक २८/०४/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना दिनांक २९/०४/२०२५ रोजी येण्यास सांगितले. त्यानुसार दिनांक २९/०४/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान गै.अ.लोकसेवक क्र. १ यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांना नोटीस न पाठविण्याकरीता प्रत्येक महिन्याला रू. १०,०००/- लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान गै.अ. लोकसेवक क्र. १ यांनी लाचेची रक्कम स्विकारून, गै.अ.लोकसेवक क्र. २ यांना दिली व सदरहू लाचेची रक्कम गै.अ. लोकसेवक क्र.३ यांना देण्यास सांगितले. त्यानुसार गै.अ.लोकसेवक क्र. ३ यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर उपरोक्त नमूद लोकसेवक यांना लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून उपरोक्त नमूद लोकसेवक यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७, १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. शिरीष माणगांवे, सहाय्यक पोलीस आयुक्त
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. गजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :- acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :- acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :- www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :- www.acbmaharashtra.net